# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने लेखे सादर करण्याबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी महाविद्यालय / परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास / परिसंस्थेस राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी या विषयावर राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा आयोजनाकरिता सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे.

गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत मंजूर अर्थसहाय्याच्या खर्चाचे लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले लेखे वित्त व लेखा विभागामार्फत केंद्रीय पध्दतीने खालील दिवशी स्वीकारण्यात येणार आहेत.

| जिल्हा/शहर | वार व दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| नाशिक | गुरुवार २३/०३/२०२३ | १० ते ६ | पर्यावरणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. |
| अहमदनगर | | | |
| पुणे शहर | | | |
| पुणे जिल्हा (ग्रामीण) | | | |

लेखे सादर करण्याची माहिती व तक्ते या अगोदरच वित्त व लेखा विभाग व नियोजन व विकास विभागाच्या परिपत्रकामध्ये उपलब्ध आहेत. माहितीसाठी त्याची लिंक पुढीलप्रमाणे आहे.
http://sppudocs.unipune.ac.in/sites/circulars/Finance%20Circulars/Check%20List%20for%20QIP%20Workshop%202022%20-%202023_14022023.pdf

महाविद्यालय / परिसंस्थांनी नियोजन व विकास विभागास आवश्यक सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेचे प्रमाणीकरण केल्यानंतरच केंद्रीय लेखा परिक्षण शिबीराच्या ठिकाणी लेखे सादर करण्यात यावेत.

**नोंदणीची (Registration) वेळ ही दुपारी १ पर्यंतच राहील त्यानंतर आलेल्या हिशेबांची नोंदणी केली जाणार नाही. महाविद्यालयांचा लेख्यांमध्ये हिस्सा असल्याने लेखा परिक्षणासाठी विद्यापीठाकडे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांची प्रत महाविद्यालयास आवश्यक असल्यास नोंदणी (Registration) करण्यापूर्वी सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढून ठेवण्यात याव्यात.**

आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये मंजूर झालेले अर्थसहाय्याचे लेखे केंद्रिय पध्दतीने वर नमूद केलेल्या शिबीरामध्येच स्विकारले जातील. त्यानंतर विद्यापीठामार्फत कोणतेही लेखे स्विकारले जाणार नाहीत व कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्य अदा केले जाणार नाही.

सदर कालावधीत महाविद्यालय / परिसंस्थांकडून विद्यापीठास लेखे सादर न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय / परिसंस्थेची राहील, याची कृपया नोंद द्यावी.

**सीएमए चारूशीला गायके**
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२२-२३/९५२९
दिनांक : ०९ मार्च, २०२३

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.